दि.कि.अर्ज क्र. ८/२०१६
दत्तात्रय वि. लाला

<u>निशाणी क्र. ६८ वरील आदेश</u>

अर्जदाराने प्रस्तूतचा अर्ज सामनेवाला क्र. १ लाला आण्णा भगत यांचे वारस अभिलेखावर घेवून त्या अनुषंगाने दाव्यामध्ये दुरुस्ती करण्यासाठी दाखल केलेला आहे.

०२. प्रस्तूत अर्जात अर्जदारांनी असे नमुद केले आहे की, सामनेवाला क्र. १ लाला आण्णा भगत यांचा मृत्यू दि. ०३.०८.२०१९ रोजी झालेला आहे. त्यामुळे अर्जामध्ये नमुद केलेप्रमाणे त्यांचे वारस सदरील प्रकरणामध्ये समाविष्ट करणे व त्या अनुषंगाने दुरुस्ती करणे न्यायाच्या दृष्टीने गरजेचे आहे. म्हणून अर्जदाराने अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

०३. प्रस्तूतचा अर्ज मंजूर करण्यास सामनेवाला यांनी हरकत घेतली आहे.

०४. प्रस्तूत अर्जाचे व अभिलेखाचे अवलोकन केले. तसेच, दोन्ही बाजूंच्या विद्वान वकिलाचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुतचे प्रकरण हे अर्जदाराचा मुळ दावा क्र. १७४/१९९७ हा पुन्हा फैलावर घेणेकरीता दाखल केले आहे. परंतू, सामनेवाला क्र. १ लाला आण्णा भगत यांचा मृत्यू दि. ०३.०८.२०१९ रोजी झाला आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणामध्ये त्यांचे वारस अभिलेखावर घेवून त्या अनुषंगाने दुरुस्ती करणे न्यायाच्या दृष्टीने गरजेचे आहे. म्हणून अर्जदाराचा प्रस्तुतचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे.

**<u>आ दे श</u>**

१. प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. अर्जदाराने सदर अर्जात नमुद केल्याप्रमाणे सामनेवाला क्र. १ याचे वारस आदेशाच्या दिनांकापासून १४ दिवसाच्या आत अभिलेखावर घेवून त्या अनुषंगाने प्रस्तुत प्रकरणामध्ये दुरुस्ती करावी.

सही/-
**(कु. एस. एस. बजाज)**

दिनांक: १५.०२.२०२३. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), दहिवडी